# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

परिपत्रक क्रमांक-१

'B' Grade (CGPA २.६२)
NAAC Accredited-२०१५

==========================================================

सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये व विद्यापीठ संकुलामध्ये शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यापीठामार्फत त्यांची पात्रता केली जाते. सदर प्रक्रियेमधील कामाची पुनरावृत्ती टाळून सदर प्रक्रिया सुलभ व कमी वेळेत पूर्ण होण्यासाठी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून खालीलप्रमाणे बदल केले आहेत.

सर्व संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ संकुलांनी प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जासोबत फक्त शैक्षणिक अर्हतेसंबंधी कागदपत्रे (१२ वी/पदवी/पदव्युत्तर/गुणपत्रक) विद्यापीठाकडे सादर करावीत. शैक्षणिक कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे उदा. स्थानांतर दाखला (Transfer Certificate), स्थलांतर दाखला ( Migration Certificate ), गॅप प्रमाणपत्र, जातीचा दाखला इ. विद्यापीठाकडे सादर करु नयेत. तथापि, सदर कागदपत्रांची तपासणी तथा पडताळणी महाविद्यालय स्तरावर करावी.

शैक्षणिक कागदपत्रांची (१२ वी/पदवी/पदव्युत्तर/गुणपत्रक ) प्राथमिक तपासणी महाविद्यालय / संकुलांनी करावी व अंतिम तपासणी विद्यापीठामार्फत केली जाईल. शैक्षणिक कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रांची (१२ वी/पदवी/पदव्युत्तर/गुणपत्रक ) प्राथमिक व अंतिम तपासणी संबंधीत महाविद्यालय व संकुलांनी करावी व तद्नंतरच अंतिम पात्रते विषयीचा प्रस्ताव Annexure V सोबत विद्यापीठास सादर करावा.

| अ) | **महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेबाबच्या सूचना:-** | |
|---|---|---|
| | १. | महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया राबवितांना प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र प्रवेश समिती नसल्यास सदरची स्वतंत्र प्रवेश समिती स्थापन करण्यात यावी व प्रवेश समितीत किमान दोन मान्यवर अनुभवी प्राध्यापक असावेत व त्या समितीचे अध्यक्ष महाविद्यालयाने नेमावे, प्रवेश समितीने विद्यापीठ नियमाप्रमाणे प्रवेश द्यावयाचे आहेत व महाविद्यालयातील प्रत्येक प्रवेश हा प्रवेश समितीमार्फतच होणे आवश्यक आहे. यासंदर्भातील माहिती प्रवेश समिती सदस्यांची नावे मोबाईल क्र./ई-मेलसह लेखी स्वरुपात ३० ऑगस्ट,२०२० पर्यंत मा. कुलसचिव, पात्रता विभाग यांना दोन प्रतीमध्ये कळवावी. प्रवेश समितीची यादी वेळेत विद्यापीठास प्राप्त न झाल्यास सदर महाविद्यालयाचे पात्रता अर्ज स्विकरण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. |
| | २. | प्रवेश समितीने प्रवेश देताना विद्यार्थ्यांचे विषयांचे नाव व विषय कोड बारकाईने तपासून घेणे आवश्यक आहे. तसेच सदर विषय आपल्या महाविद्यालयात शिकविला जातो किंवा नाही, सदर विषयास विद्यापीठाची मान्यता असल्याबाबतची खातरजमा करुनच प्रवेश द्यावा, कोणत्याही परिस्थितीत अपुर्ण कागदपत्रांवर किंवा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांला प्रवेश देण्यात येवू नये, असे प्रवेश झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य यांची राहील. |
| | ३. | विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही महाविद्यालयाचे प्रतिनिधी ऑनलाईन पात्रता अर्ज भरताना त्यात विद्यार्थ्यांची मागील शैक्षणिक अर्हता, अभ्यासक्रमाचे नाव, बोर्ड/विद्यापीठाचे नाव इत्यादी माहिती अचूक नमूद करीत नाहीत, त्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण होत असतात. तेव्हा, सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या www.ugc.ac.in हया संकेतस्थळावर विद्यापीठांची मान्यता प्राप्त यादी/माहिती उपलब्ध असून महाविद्यालयांनी सदरची माहिती प्राप्त करुन घ्यावी. मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शालांत बोर्ड (१२ वी) / विद्यापीठ/ संस्था मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच शैक्षणिक पात्रतेनुसार प्रवेश देण्यात यावा. बोगस विद्यापीठांची (Fake Universities) पदवी/पदवीका घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास त्याबाबत संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहील. |
| | ४. | महाविद्यालयांमध्ये प्रवेशाच्या वेळेस विद्यार्थ्याचे नाव इयत्ता १२ वी च्या गुणपत्रकावर नमूद केलेल्या नावाप्रमाणे ऑनलाईन पात्रता अर्जामध्ये भरावे, विद्यार्थ्यांच्या नावात दुरुस्ती असल्यास त्याच शैक्षणिक वर्षात विद्यापीठ नियमानुसार बदल करुन घेण्याची कार्यवाही करावी. परस्पर विद्यार्थ्यांचे नावात किंवा आडनावात बदल करु नये. |
| | ५. | महाविद्यालयांनी / संकुलांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कागदपत्रे व शैक्षणिक कागदपत्रांव्यतिरिक्त कागदपत्रे (उदा. स्थानांतर दाखला (Transfer Certificate), स्थलांतर दाखला ( Migration Certificate ), गॅप प्रमाणपत्र, जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र इ.) तपासूनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. |
| | ६. | विद्यापीठास विद्यार्थ्याच्या पात्रतेबद्दल तक्रार प्राप्त झाल्यास महाविद्यालयास/ संकुलास विद्यार्थ्याचे शैक्षणिक व इतर कागदपत्रे विद्यापीठास सादर करणे बंधनकारक असल्याने महाविद्यालयाने/ संकुलाने शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती व इतर कागदपत्रांच्या मूळ प्रती जतन करावेत.<br>विद्यापीठात पात्रता अर्ज सादर केल्यानंतर जे विद्यार्थी प्रवेश रद्द करतील अशा विद्यार्थ्यांच्या पी.आर.एन.सह नावांची यादी दोन प्रतीत विद्यापीठ कार्यालयात (एक प्रत ई-सुविधा कक्ष व एक प्रत पात्रता विभागात) मा.प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने तात्काळ सादर करण्यात यावी. प्रवेश रद्द झालेल्या विद्यार्थ्यांचे कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज भरले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | ७. | प्रवेशीत विद्यार्थ्यांची पात्रता प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षात पुर्ण करणे बंधनकारक आहे. जर काही विद्यार्थ्यांची त्यांच्या अभ्यासक्रम कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांची पात्रता झाली नाही तर अश्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही संबंधित महाविद्यालयाने त्यांच्या स्तरावर करावी व तसा अहवाल विद्यापीठास सादर करावा. |
| ब) | **विद्यार्थी प्रवेश व प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती तपासणे:-** | |
| | | निकालाचे कामकाज करीत असताना विद्यापीठ कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या नावाचे स्पेलिंग, आईचे नाव नमुद करताना चूक केल्यामूळे तसेच चुकीचे विषय निवडून Student Data Upload केल्यामुळे परीक्षा अर्ज आणि प्रवेशपत्रावर नाव व विषय चुकीचे छापले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे निकाल राखीव राहतात. या चुका टाळण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी. |
| | १. | Digital University Portal वर सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांचा Student Data Upload करण्यापूर्वी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या नावाचे स्पेलिंग, सर्व विषय हे प्रथमत: महाविद्यालयाने तपासावेत, त्यात काही दुरुस्ती असल्यास ऑनलाईन पध्दतीने दुरुस्ती करुन घेण्यात यावी व तद्नंतर पात्रता अर्ज विद्यार्थ्यांना वितरित करीत असताना पात्रता अर्जावरील विद्यार्थ्यांचे नाव, नावाचे स्पेलिंग, आईचे नाव व पात्रता अर्जावर छापलेले विषय हे काळजीपूर्वक तपासण्यासंदर्भात सूचना देण्यात याव्यात व सर्व माहिती ही विद्यार्थ्यांनी तपासलेली आहे याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेऊनच सर्व दुरुस्त्यांसह Data Upload करण्यात यावा, जेणे करुन विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर बिनचूक माहिती छापता येईल व निकालातील त्रुटी व विद्यार्थ्यांच्या नावातील दुरुस्तीचे प्रमाण टाळता येऊ शकेल. |
| | २. | ज्या विद्यार्थ्यांनी सोलापूर विद्यापीठामधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे व जे पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्रवेश घेणार आहेत अशा विद्यार्थ्यांची वेगळी Data Entry न करता पदवी अभ्यासक्रमास प्राप्त झालेल्या PRN(१६अंकी) नुसार Digital University Portal मध्ये प्रवेश द्यावा. त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांची पदवी अन्य विद्यापीठाची आहे व ते प्रस्तुत विद्यापीठामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणार आहेत अशा विद्यार्थ्यांची Digital University Portal मध्ये नव्याने Scanning व Data Entry करावी. |
| | ३. | पदवी स्तरावरील प्रथम वर्षास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून Online Application पध्दतीने प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी. जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरतील त्यांची माहिती Digital College Login मधून नव्याने भरण्याची आवश्यकता राहणार नाही. महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगीनमधून विद्यार्थ्याने भरलेली माहिती जसे विद्यार्थ्याचे नाव (इ.१२ वी प्रमाणपत्रावरील नाव व पदवी परीक्षेसाठीचे नाव), निवडलेला विषय, वैकल्पीक विषय, महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय आदी बाबीची माहिती तपासून व पडताळणी करुन घेण्यात यावी. उपरोक्त सर्व बाबींच्या पुर्ततेनंतर विद्यार्थ्याचा प्रथम वर्षाचा प्रवेश College Login मधून अंतीम व निश्चित (Confirm) करण्यात यावा. |
| | ४. | सदर प्रवेश मंजूर प्रवेश क्षमते इतके करावे. तसेच विद्यार्थ्यांस पुनर्प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याची मागील परीक्षेची संपादणूक रद्द करुन एकदाच पुनर्प्रवेश द्यावयाचा आहे. एखाद्या विद्यार्थ्यास दुस-यांदा पुनर्प्रवेश दिल्याचे निदर्शनास आल्यास सदर पुनर्प्रवेश मान्य केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| क) | **महाविद्यालय बदला संदर्भात:-** | |
| | | विद्यापीठाच्या महाविद्यालय बदलासंदर्भातील प्रचलित नियमास अनुसरुन जे विद्यार्थी बदल करुन पुढील वर्गाच्या प्रवेशासाठी दुस-या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छित असतील त्यांना पूर्वीच्या ( जुन्या) महाविद्यालयाने Online Transfer Certificate / TC Code तयार करुन देण्यात यावेत. तसेच नवीन महाविद्यालयानी सदर विद्यार्थ्यांस प्रवेश देताना त्याच्या Online TC वर उपलब्ध असलेल्या TC Code नुसार आपल्या महाविद्यालयात Online Transfer करुन घ्यावे. सदरची कार्यवाही ही दोन्ही महाविद्यालयांनी करणे बंधनकारक असून यामुळे महाविद्यालयात बदल केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज व प्रवेशपत्र हे नवीन महाविद्यालयात तयार होतील, त्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणी येणार नाहीत. |
| ड) | **पात्रता शुल्क व पात्रते संदर्भातील नियम:** | |
| A) | एम. फील. व पीएच.डी या व्यतिरिक्त सर्व अभ्यासक्रमाचे एम.के.सी.एल Software मधून generate होणारे पात्रता अर्ज विद्यापीठ कार्यालयात दाखल करावयाच्या अंतिम तारखा व पात्रता शुल्क परिशिष्ट क्र.१ (Appendix-I) मध्ये नमुद केल्याप्रमाणे असून पात्रता अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे परिशिष्ट क्र.२ (Appendix-II) मध्ये नमुद केली आहेत, त्याप्रमाणे पात्रता अर्ज व पात्रता शुल्काची पुर्तता विहित मुदतीत करण्यात यावी. | |
| B) | १. | प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे (पदवी, पदव्युत्तर, पदविका) पात्रता अर्ज विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. पात्रता अर्ज विहित मुदतीत पाठवण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील. |
| | २. | विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेत असताना विद्यापीठाच्या नियमानुसार पात्रता पडताळणी करण्याची जबाबदारी संबधित महाविद्यालयाची / संकुलाची आहे. तेव्हा याप्रमाणे ज्या-त्या अभ्यासक्रमाची प्रवेश पात्रता तपासूनच प्रवेश देण्यात यावेत. सदरचे प्रवेश देत असताना विद्यापीठामार्फत अंतिम पात्रता मंजूर होईपर्यंत संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्पुरत्या (प्रोव्हिजनल) स्वरुपाचा राहील याची विद्यार्थ्यांना पूर्ण कल्पना द्यावी. नंतर अशा विद्यार्थ्यांच्या कोणत्याही तक्रारी ऐकुन घेतल्या जाणार नाहीत याची स्पष्ट कल्पना सर्व विद्यार्थ्यांना देण्यात यावी. |
| | ३. | प्रवेश पात्रतेबाबत काही शंका असल्यास असे पात्रता अर्ज स्वंतत्रपणे विद्यापीठाकडुन पाठवून त्वरीत विद्यापीठास अभिप्राय घ्यावा. पात्रता अर्ज स्वतंत्रपणे न पाठविल्याने विद्यापीठास अशा विद्यार्थ्यांच्या पात्रतेबाबत त्वरीत महाविद्यालयास कळविणे शक्य होत नाही. त्यामुळे महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर अनेक अडचणी उद्भवण्याची शक्यता विचारात घेऊन या परिपत्रकात दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावेअन्यथा यामुळे उदभवणाऱ्या अडचणीची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील. |

| | | |
|---|---|---|
| | ४. | पात्रता अटी पुर्ततेबाबत संदिग्धता असणाऱ्या विद्यार्थ्यांना तात्पुरते प्रवेश देवून विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेशाबाबत स्पष्ट कल्पना दयावी. |
| | ५. | अन्य विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांबाबत (महाराष्ट्रातील, भारतातील) किंवा परदेशी विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज स्वतंत्रपणे Covering पत्रासोबत पाठवण्यात यावेत. |
| | ६. | प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज विद्यापीठाकडे पाठविण्यात येवू नयेत. |
| | ७. | नियमित अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमानुसार हजेरीबाबत अट लागू असल्याने पूर्ण वेळ नोकरी करणारे व प्रवेशास इच्छुक असणारे उमेदवारांने ते नोकरी करत असलेल्या कार्यालय प्रमुखाकडून नियमीत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यास हरकत नसल्याबद्दलचे ( ना-हरकत प्रमाणपत्र) प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय प्रवेश देवू नये. सदर प्रवेशीत विद्यार्थ्यांची विद्यापीठ नियमाप्रमाणे महाविद्यालयामधील उपस्थितीची संपूर्ण जबाबदारी संबंधीत प्राचार्य / संचालक यांची राहील. |
| | ८. | ज्या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी वयाची व गुणांच्या टक्केवारीची अट घालण्यात आलेली आहे, त्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पात्रता अर्ज पात्रता विभागात जमा करताना संबंधीत महाविद्यालयांनी सदर विद्यार्थ्यांच्या वय, टक्केवारी दर्शविणाऱ्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती पात्रता अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे |
| C) | <u>पात्रता अर्ज प्रक्रियेबाबत व विद्यापीठाकडे पाठविण्याबाबत संबंधित महाविद्यालयाच्या कार्यालयाकरीता सूचना:-</u> | |
| | १. | <u>संबंधीत अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने संलग्नता मंजूर केलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत जोडावी.</u> |
| | २. | नवीन विषय, नवीन तुकडी, नवीन विद्याशाखा, वाढीव विद्यार्थी संख्या याबाबत विद्यापीठाने मंजूरी दिलेल्या परिपत्रकाची साक्षांकित प्रत जोडावी. |
| | ३. | महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक १८९८(१९७/९८) व्दूमाशि-१ दि. २४ जून १९९९ च्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांकडून प्रथम गुणपत्रिका प्रमाणपत्रे यांच्या छायांकित प्रती स्विकाराव्यात व प्रत्यक्ष प्रवेश देताना मुळ गुणपत्रिका यांच्या सत्यतेबाबत पडताळणी करुन यावर प्राचार्यांनी /विभागप्रमुखांनी स्वाक्षरी करावी. मूळ गुणपत्रिका, प्रमाणपत्रे इत्यादी विद्यार्थ्यांस लगेच परत करावीत. |
| | ४. | शंकास्पद परिस्थितीत मूळ गुणपत्रिका, प्रमाणपत्रे रोखण्यात येवून त्याच्या सत्यतेबाबत महाविद्यालयाने पडताळणी करावी. |
| | ५. | पात्रता अर्जाच्या यादया दोन प्रतीमध्ये पाठवाव्यात व पात्रता अर्ज जमा करतेवेळी विद्यार्थ्यांची यादी आद्याक्षराप्रमाणे (अल्फाबेटीकल सुरवातीला आडनाव) या स्वरुपात असावी (पात्रता यादया Appendix-IV दर्शविल्याप्रमाणेच असाव्यात) संबंधीत महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रमाच्या पात्रता अर्जाचा गोषवारा सोबतच्या Appendix-VI प्रमाणे भरुन आणणे आवश्यक राहील अन्यथा सदर महाविद्यालयाचे पात्रता अर्ज स्विकारले जाणार नाहीत. |
| | ६. | विद्यार्थ्यांचे मूळ गुणपत्रक व दाखल्याच्या मूळ प्रती विद्यापीठाकडे अजिबात पाठवू नयेत. |
| | ७. | पात्रता अर्ज पूर्णपणे भरला असल्याची खात्री पटल्यानंतरच विद्यार्थ्यांची स्वाक्षरी बघूनच प्राचार्यांनी किंवा संबधितांनी स्वाक्षरी करावी. |
| | ८. | पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी पात्रता अर्जात पदवीच्या विषयाचा अथवा स्पेशलाईझेशनचा उल्लेख करावा. |
| | ९. | ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा लागू आहेत, अशा अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यास (गुणवत्तेनुसारच) प्रवेश द्यावा. प्रवेश परीक्षा न दिलेल्या विद्यार्थ्यास प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास नियमाप्रमाणे महाविद्यालयास दंड आकारुन पूढील कार्यवाही केली जाईल. |
| | १०. | प्रस्तुत विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठातील पदवीच्या अभ्यासक्रमात शिकत असलेले विद्यार्थी त्यांच्या काही अडचणीस्तव निम्यातून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. सोविसो/पात्रता विभाग/२०१६-१७/१०६७७ दि.२२ नोव्हेंबर,२०१६ प्रमाणे कार्यवाही करावी. |
| | ११. | On-line पात्रता अभ्यासक्रमासाठी ज्या विद्यार्थ्यांचा Data Uploading केलेला आहे त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची यादी असावी. जर On-line मधील Data व यादीमधील विद्यार्थी यामध्ये बदल आढळून आल्यास होणाऱ्या परिणामाची सर्व जबाबदारी महाविद्यालयीन प्राचार्यांवर राहील. |
| | १२. | ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश काही कारणास्तव रद्द झाले असतील तर त्याची माहिती विद्यापीठास सत्वर कळवावी. |
| | १३. | अ) <u>प्रस्तुत विद्यापीठाने ज्या अभ्यासक्रमास ऑनलाईन प्रणाली लागू आहे, अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अपूर्ण पात्रता अर्जातील त्रुटीबाबतची माहिती महाविद्यालयाने त्यांच्या Login मध्ये जाऊन पहावी व त्याप्रमाणे त्रुटींची पुर्तता १५ दिवसांच्या आत करण्यात यावी. तसेच ऑनलाईन अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटींची पुर्तता करताना विद्यार्थ्यांचे ऑनलाईन स्टेटस रिपोर्ट जोडूनच सर्व कागदपत्रांची पुर्तता विद्यापीठाकडे करावी अन्यथा अपुर्ण त्रुटी स्विकारल्या जाणार नाहीत. सदर त्रुटींची पुर्तता ३१ जानेवारी,२०२१ पूर्वी करण्यात यावी अन्यथा प्रति विद्यार्थी रु.५००/-प्रमाणे दंडाची रक्कम संबंधित महाविद्यालयाकडून वसुल करुनच संबंधित विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.</u><br>ब) <u>त्याचप्रमाणे ज्या अभ्यासक्रमास विद्यापीठाने अद्याप ऑनलाईन प्रणाली लागू केली नाही, अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अपूर्ण पात्रता अर्जातील कळविलेल्या त्रुटींची पुर्तता देखिल एक महिन्याच्या आत करावी अन्यथा त्रुटींची पुर्तता विहित मुदतीत न झाल्यास प्रति विद्यार्थी रु.५००/- प्रमाणे दंडाची रक्कम संबंधित महाविद्यालयाकडून वसुल करुन मगच पात्रता कायम करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.</u> |

| | | | |
|---|---|---|---|
| | १४. | पात्रता अर्ज विद्यापीठात सादर करताना पात्रता अर्जासंबंधीची माहिती असणाऱ्या कर्मचाऱ्यासोबतच पाठवून दयावेत. | |
| | १५. | अ) | जे विद्यार्थी परीक्षेचा अर्ज भरल्यानंतर परीक्षेस बसून सर्व विषयामध्ये नापास झाले असतील अथवा सर्व विषयामध्ये गैरहजर असतील अशा विद्यार्थ्यांना Re-admission देता येईल. |
| | | ब) | जे विद्यार्थी प्रथम वर्षासाठी यापूर्वी परीक्षेस बसले होते तसेच ते काही विषयामध्ये पास अथवा नापास झाले असतील अशा विद्यार्थ्यांना Re-admission देता येत नाही. त्यांना Repeater म्हणूनच परीक्षेस बसावे लागेल. परंतु जर तो विद्यार्थी फॅकल्टीत बदल करणार असल्यास त्याचा मागील वर्षातील Performance (संपादणुक) रद्द करूनच त्यास Re-admission दयावे अन्यथा तो Repeater म्हणूनच परीक्षेस पात्र होईल. |
| | १६. | पात्रता अर्ज यादीतील अनुक्रमांक व अर्ज क्रमांक सारखचे असावेत व त्या प्रमाणेच अर्ज बॉक्स फाईलमध्ये जोडलेले असावेत (एका बॉक्स फाईलमध्ये एकाच अभ्यासक्रमाचे ५०/१०० इतकेच फॉर्म असावेत). | |
| | १७. | पात्रता अर्ज विद्यापीठाकडे सादर करावयाच्या अतिरिक्त विलंब शुल्काच्या अंतिम तारखेनंतर पात्रता अर्ज प्राधिकरणाच्या निर्णयानुसार प्रति विद्यार्थी प्रति दिन रु.५०/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारुनच स्विकारण्यात येतील, याची नोंद घ्यावी. | |
| | १८. | पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षामध्ये दुसऱ्या विद्यापीठामधील प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जाबरोबर जे विद्यार्थी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदवीधर झालेले आहेत व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेत आहेत, अशा विद्यार्थ्यांच्या नावांची यादी, गुणपत्रकांच्या सांक्षांकित प्रती व पात्रता अर्ज पाठवावेत तसेच सदर विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज (Registration form) A.R.D. संलग्नता विभागात प्रस्तुत विद्यापीठाचे पदवीधर व अन्य विद्यापीठातील पदवीधर अशा वेगवेगळया फाईलमध्ये जमा कराव्यात. | |
| | १९. | ज्या अभ्यासक्रमाचे पात्रता अर्ज ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून विद्यापीठाकडे सादर करण्यात येणार आहेत अशा अभ्यासक्रमाचे पात्रता शुल्क ऑनलाईन जमा करावे व ज्या अभ्यासक्रमाचे अर्ज हे ऑफलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे जमा होणार आहेत अशा अभ्यासक्रमाचे पात्रता शुल्क ज्या त्या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र डीमांड ड्राफ्ट (डी.डी.) व्दारे जमा करावे. | |
| | २०. | प्रस्तुत विद्यापीठातील पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने याच विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असल्यास विद्यापीठ प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पात्रता शुल्क आकारण्यात येत असून त्यानुसार शुल्काचा तपशील Appendix-I मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील. | |
| | २१. | पात्रता अर्ज योग्य पध्दतीने व पुर्ण भरलेले नसल्यास तो अर्ज बाद ठरवून दफ्तरी दाखल केला जाईल, याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. | |
| | २२. | ज्या अभ्यासक्रमाची पात्रता ऑनलाईन केली जात नाही अशा अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची यादी Soft Copy व Hard Copy दोन्ही प्रतीमध्ये सादर करावी. | |
| | २३. | **पात्रता विषयी अधिकच्या महितीसाठी या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेले Appendix- I, II, III, IV,V,VI,VII चे अवलोकन व्हावे.** | |

जा.क्र.सोविसो/पात्रता विभाग/२०२०-२१/7239 दि. / /२०२० 20 AUG 2020

प्रति,
सर्व सलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुले,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

आपला विश्वासु,

(डॉ. वि.गा.घुटे)
कुलसचिव

सोबत :- Appendix- I, II, III, IV,V,VI,

सूचना :-

१) Online Admission संदर्भातील अडचणीसंदर्भात ०२१७-२७४४७७८ (विस्तारीत क्रमांक -१४०/१३३) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
२) पात्रते संदर्भातील अडचणी संदर्भात ०२१७-२७४४७७८ (विस्तारीत क्रमांक -११६) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
३) सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Admission - Eligibility या लिंकवर उपलब्ध आहे.
४) पात्रता अर्ज स्विकारणाच्या अंतिम दिनांकापर्यंतच Protal वरुन विद्यार्थ्यांचा Data Upload करता येईल.

प्रत:-

१. पी.जी.प्रवेश विभाग
२. संलग्नता विभाग
३. परीक्षा विभाग (संगणक केंद्र)
४. वित्त व लेखा विभाग
५. शुल्क समिती
६. एम.के.सी.एल. विभाग

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

।। विद्यया संपन्नता ।।

NAAC Accredited-२०१५
'B' Grade (CGPA २.६२

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

(Appendix- I )

## पात्रता शुल्काचा तक्ता

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | महाराष्ट्रातील विविध विद्यापीठ व मंडळामधून शैक्षणिक अर्हता पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना | महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्यातील विविध विद्यापीठे व मंडळामधून शैक्षणिक अर्हता प्राप्त विद्यार्थ्यांना | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पदवी अभ्यासक्रम बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी. (Entrepreneurship), बी.एस्सी. (Bio- Tech), | नियमित शुल्क | २८ सप्टेंबर,२०२० | ७५/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | ०६ ऑक्टोंबर,२०२० | ७५+५०=१२५/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | १३ ऑक्टोंबर,२०२० | १२५+२००=३२५/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | १७ ऑक्टोंबर,२०२० | ३२५+५००=८२५/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |
| | | पात्रता अर्ज आवश्यक शैक्षणिक गुणपत्रकाच्या छायांकित प्रती व Appendix V सोबत पात्रता विभागात जमा करण्याची मुदत २२ ऑक्टोंबर,२०२० | | | | |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना | अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना (महाराष्ट्रातील) | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर (महाराष्ट्राबाहेरील व भारतातील ) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एल.एल.एम., एम.एस डब्लु, पी.जी.डी.सी.ए, डी.बी.एम., PG.Diploma in Dietetics and Nutrituion | नियमित शुल्क | विद्यापीठाकडून यथाअवकाश जाहीर करण्यात येतील. | ५०/- | १५०/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | | ५०+५०=१००/- | १५०+५०=२००/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | | १००+२००=३००/- | २००+२००=४००/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | | ३००+५००=८००/- | ४००+५००=९००/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |
| | | पात्रता अर्ज आवश्यक शैक्षणिक गुणपत्रकाच्या छायांकित प्रती व Appendix V सोबत पात्रता विभागात जमा करण्याची मुदत विद्यापीठाकडून यथाअवकाश जाहीर करण्यात येईल. | | | | | |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना | महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना (भारतातील ) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | पदवी व्यावसायिक अभ्यासक्रम बी.बी.ए.,बी.सी.ए. बी.एस्सी. ( E.C.S.), B.J.M.C. & B. Lib Info.Sci. B.VOC (Food Processing and Mangement) | नियमित शुल्क | २८ सप्टेंबर,२०२० | १००/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | ०६ ऑक्टोंबर,२०२० | १००+५०=१५०/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | १३ ऑक्टोंबर,२०२० | १५०+२००=३५०/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | २० ऑक्टोंबर,२०२० | ३५०+५००=८५०/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |
| | | पात्रता अर्ज आवश्यक शैक्षणिक गुणपत्रकाच्या छायांकित प्रती व Appendix V सोबत पात्रता विभागात जमा करण्याची मुदत २४ ऑक्टोंबर,२०२० | | | | |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना | महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना (भारतातील) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | पदवी व्यावसायिक अभ्यासक्रम five year integrated M.Tech Course in cosmetic technology | नियमित शुल्क | २८ सप्टेंबर,२०२० | १५०/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | ०६ ऑक्टोंबर,२०२० | १५०+५०=२००/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | १३ ऑक्टोंबर,२०२० | २००+२००=४००/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | २० ऑक्टोंबर,२०२० | ४००+५००=९००/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |
| | | पात्रता अर्ज आवश्यक शैक्षणिक गुणपत्रकाच्या छायांकित प्रती व Appendix V सोबत पात्रता विभागात जमा करण्याची मुदत २३ ऑक्टोंबर,२०२० | | | | |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना | महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना (भारतातील) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | D.T.E.कडून देण्यात येणारे प्रवेश व केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे देण्यात येणारे पदवी अभ्यासक्रम बी.टेक, बी.फार्मसी, आर्किटेक्चर, | नियमित शुल्क | D.T.E मुंबई /केंद्रीय समिती पुणे याची प्रवेश फेरी झाल्यापासून १५ | १००/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | नियमित/विनाविलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर ५ दिवस | १००+५०=१५०/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर ५दिवस | १५०+२००=३५०/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | विशेष विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १० दिवस | ३५०+५००=८५०/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना | महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना (भारतातील) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा मुंबई यांचे कडून प्रवेश देण्यात येणारे पदवी अभ्यासक्रम बी.एड, बी.पी.एड, बी.ए. एल.एल.बी, एल.एल.बी. | नियमित शुल्क | आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा मुंबई याची प्रवेश फेरी झाल्यापासून १५ दिवस | १००/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | नियमित/विनाविलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर ५ दिवस | १००+५०=१५०/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर ५दिवस | १५०+२००=३५०/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | विशेष विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १० दिवस | ३५०+५००=८५०/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना (महाराष्ट्रातील) | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर (महाराष्ट्राबाहेरील व भारतातील) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | D.T.E.कडून देण्यात येणारे प्रवेश व केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे देण्यात येणारे पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.टेक, एम.फार्मसी, एम.बी.ए, एम.सी.ए. | नियमित शुल्क | D.T.E मुंबई /केंद्रीय समिती पुणे याची प्रवेश फेरी झाल्यापासून १५ दिवस | ५०/- | १५०/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | नियमित/विनाविलंब शुलची मुदत संपल्यानंतर ५ दिवस | ५०+५०=१००/- | १५०+५०=२००/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर ५दिवस | १००+२००=३००/- | २००+२००=४००/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | विशेष विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १० दिवस | ३००+५००=८००/- | ४००+५००=९००/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना (महाराष्ट्रातील) | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील (महाराष्ट्राबाहेरील) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा मुंबई यांचे कडून प्रवेश देण्यात येणारे पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.एड , एम.पी.एड | नियमित शुल्क | आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा मुंबई याची प्रवेश फेरी झाल्यापासून १५ दिवस | ५०/- | रु.१५०/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | नियमित/विनाविलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर ५ दिवस | ५०+५०=१००/- | १५०+५०=२००/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर ५ दिवस | १००+२००=३००/- | २००+२००=४००/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | विशेष विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १० दिवस | ३००+५००=८००/- | ४००+५००=९००/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना (महाराष्ट्रातील) | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील (महाराष्ट्राबाहेरील) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | एम.फील अभ्यासक्रम | नियमित शुल्क | नाव नोंदणी केल्यापासून ३० दिवसांपर्यत | १००/- | १५०/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | नियमित/विना विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १५ दिवस | १००+५०=१५०/- | १५०+५०=२००/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १५ दिवस | १५०+२००=३५०/- | २००+२००=४००/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | विशेष विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १० दिवस | ३५०+५००=८५०/- | ४००+५००=९००/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |

| अ क्र | तपशील | शुल्क | विहित मुदत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना (महाराष्ट्रातील) | अन्य विद्यापीठ क्षेत्रातील (महाराष्ट्राबाहेरील) | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | पीएच.डी अभ्यासक्रम | नियमित शुल्क | नाव नोंदणी केल्यापासून ३० दिवसांपर्यत | १५०/- | १५०/- | ३००/- | ५००/- |
| | | विलंब शुल्क | नियमित/विना विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १५ दिवस | १५०+५०=२००/- | १५०+५०=२००/- | ३००+१००=४००/- | ५००+१००=६००/- |
| | | विशेष विलंब शुल्क | विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १५ दिवस | २००+२००=४००/- | २००+२००=४००/- | ४००+३००=७००/- | ६००+३००=९००/- |
| | | अतिरिक्त विलंब शुल्क | विशेष विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर १० दिवस | ४००+५००=९००/- | ४००+५००=९००/- | ७००+५००=१२००/- | ९००+५००=१४००/- |

सूचना : १) सर्व अभ्यासक्रमांसाठी अतिरिक्त विलंब शुल्कानंतर प्रति दिन प्रति विद्यार्थी ५०/- रुपये आकारण्यात येतील.

२) वरील नमुद केलेल्या तारखांमध्ये जर दिलेलया दिनांकास सार्वजनिक सुट्टी / रविवार किंवा दुसरा किंवा चौथा शनिवार येत असेल तर त्या तारखेच्या पुढील कामकाजाचा दिवस ग्राहय धरण्यात येईल.

# महाविद्यालयाने पात्रता अर्जासोबत विद्यापीठास सादर करावयाचे कागदपत्रे

(Appendix- II)

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | पीएच.डी. ( विद्यावाचस्पती) | I. | मुदतीत सादर केलेला पात्रता अर्ज<br>( प्रवेश घेतल्यापासून ३० दिवसांच्या आत) |
| | | II. | पदव्युत्तर पदवी गुणपत्रिकेची (सर्व वर्षांची ) छायांकित प्रत |
| | | III. | प्रवेश घेतेलेले विद्यापीठाचे पत्र |
| | | IV. | स्थलांतर दाखला ( Migration Certiificate ) Original |
| | | V. | स्थानांतर दाखला ( Transfer Certificate )छायांकित प्रत |
| | | VI. | प्रवेश व पात्रता शुल्क जमा केलेली पावती |
| २. | एम.फील. | I. | मुदतीत सादर केलेला पात्रता अर्ज<br>(प्रवेश घेतल्यापासून ३० दिवसांच्या आत) |
| | | II. | पदव्युत्तर पदवी गुणपत्रिकेची ( सर्व वर्षांची छायांकित प्रत) |
| | | III. | प्रवेश घेतेलेले विद्यापीठाचे पत्र |
| | | IV. | स्थलांतर दाखला ( Migration Certiificate ) Original |
| | | V. | स्थानांतर दाखला ( Transfer Certificate )छायांकित प्रत |
| | | VI. | प्रवेश व पात्रता शुल्क जमा केलेली पावती |
| ३. | एम.ए.(सर्वविषय)/एम.कॉम./ एम.एस्सी..(सर्वविषय)/ एल.एल.एम./ पी.जी.डी.डी.एन./एम.एस डब्लु,/पी.जी.डी.सी.ए./ डी.बी.एम | I. | पदवी गुणपत्रकाची ( सर्व वर्षांची छायांकित प्रत) |
| ४. | बी.ए. व इतर पदवी अभ्यासक्रम | I. | बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिकांची छायांकित प्रत. |
| ५. | DTE व ARA कडून केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश देण्यात येणारे अभ्यासक्रम | I.<br><br>II. | बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिकांची छायांकित प्रत.<br>संबंधीत प्राधिकरणाकडून ( DTE/ARA) महाविद्यालयांशी संलंग्नित असणा-या अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थ्यांची प्रमाणित यादी. |

# विद्यार्थ्यांने महाविद्यालयास सादर करावयाची कागदपत्रे

## Appendix- III

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १. | गुणपत्रक ( १२/पदवी/पदव्युत्तर पदवी ) |
| २. | स्थानांतर दाखला ( Transfer Certificate लागू असल्यास) |
| ३. | स्थलांतर दाखला ( Migration Certificate लागू असल्यास) |
| ४. | जातीचा दाखला /जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ५. | गॅप प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ६. | रहिवासी दाखला / राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ७. | वयाचा दाखला (लागू असल्यास) |

NAAC Accredited-२०१५
'B' Grade (CGPA २.६२)

PUNYASHLOK AHILYADEVI HOLKAR SOLAPLUR UNIVERSITY, SOLAPLUR

विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जाच्या यादीचे स्वरुप

(Appendix- IV)

To,

The Register

PUNYASHLOK AHILYADEVI HOLKAR SOLAPLUR UNIVERSITY, SOLAPLUR

Subject: - Eligibility Certificate for the year 2020-21

Sir,

I am sending the documents of the following students for further necessary action of eligibility process.

| Sr. No. | Full name of Student | Class | Attached Certificate | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | H.S.C. | U.G. | P.G. |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| ८ | | | | | |

Thank you

Yours sincerely,

Principal/ Director,

( Sign with stamp)

NOTE : U.G.- Under Graduation , P.G. - Post Graduation

Appendix-V

**प्रति,**

मा. कुलसचिव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय : शैक्षणिक वर्ष --------------- मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या पात्रता प्रस्तावाबाबत..

संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक--------------दि.-----------------

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन मी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे -------इतक्या-------या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या खालील नमुद विद्यार्थ्यांच्या नियमानुसार व इतर कागदपत्रांची ( स्थलांतर दाखला, स्थानांतर दाखला, गॅप प्रमाण पत्र इ.) विद्यापीठ अध्यादेशानुसार / शैक्षणिक व इतर कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र विद्यार्थ्यांची यादी कायम पात्रता करण्यासाठी विद्यापीठाकडे सादर करीत आहे ( संदर्भासाठी तक्ता पुढील पानावर जोडण्यात आला आहे)

सदर यादीमधील विद्यार्थी अपात्र आढळून आल्यास विद्यापीठ नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यास माझी काही हरकत नाही.

आपला विश्वासू,

प्राचार्य / संचालक,

( संलग्नित महाविद्यालय/ विद्यापीठ संकुल)

Appendix- VI

महाविद्यालयाचे नाव :-

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर सन (२०२०-२१) मध्ये प्रथम / थेट द्वितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा पात्रतेसाठीचा गोषवारा

पात्रतेचे काम पाहणा-या कर्मचा-याचे नाव : श्री ______________________________

संपर्कासाठी मोबाईल नं. :___________________________

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | प्रवेशीत विद्यार्थी संख्या | पात्रता अर्जाचे शुल्क | पात्रता शुल्क | विलंब शुल्क / अतिविलंब शुल्क | एकूण शुल्क | पावती क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

प्राचार्य,

(सही व शिक्का)

दिनांक :